04-02-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03-02-2025 23:03 Page 1

निवडक

सेलस्तान सिल्वेरा, नाझिया रॉड्रिग्सला बुद्धिबळमध्ये रेटिंग १४४४ प्राप्त

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ३ : विद्या विकास अकादमीच्या सेलस्तान सिल्वेरा आणि नाझिया रॉड्रिग्स (वेलसांव)चा मुलगा सानियो लिस्टन सिल्वेरा यांनी बुद्धिबळ गुरू अकादमी मडगाव यांच्या मार्गदर्शनाखाली बुद्धिबळाचा प्रवास सुरू केल्यापासून १० महिन्यांच्या कालावधीत मानक रेटिंग १४४४ प्राप्त केले आहे. सानियोला स्वर्गीय मनोहर पर्रीकर ३री गोवा आंतरराष्ट्रीय ओपन ग्रँडमास्टर बुद्धिबळ श्रेणी उ १७०० टूर्नामेंट २०२५ च्या खाली ण ९ श्रेणीतील ३रा सर्वोत्कृष्ट गोवा खेळाडू म्हणून निवडण्यात आले.त्याने २०२४ च्या म्हैसूरमधील आंतरराष्ट्रीय रॅपिड फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत बक्षीस जिंकले आहे. ण९, ण११, ण१३ राज्य निवडीत त्याने भाग घेतला. २७ डिसेंबर २०२४ ते २ जानेवारी २०२५ या कालावधीत पुणे येथे झालेल्या ३७ व्या राष्ट्रीय यु ९ खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत त्याने गोव्याचे प्रतिनिधित्व केले आहे.

महामाया कालिका देवस्थानात आज रथसप्तमी उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ३ : श्री महामाया कालिका देवस्थान वन, डिचोली येथे मंगळवार दि. ४ फेब्रुवारी रोजी रथसप्तमी उत्सव विविध कार्यक्रमानिशी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी ६.३० वाजता सनई वादन, सकाळी ९.३० वाजता श्री चरणी लघुरुद्र,महाभिषेक, श्रीसुक्त हवन,सकाळी ११.३० वाजता कुंकुमार्जन, दुपारी १ वाजता श्री सूर्यनारायण महापूजा, श्री पालखी प्रदक्षिणा,आरती व तीर्थप्रसाद,दुपारी २ वाजता. महाप्रसाद,संध्याकाळी ४ वाजता श्री देवीची ओटी भरणे व हळदी कुंकू, संध्याकाळी ५ वाजता स्थानिक कलाकारांचा भजनाचा कार्यक्रम, ७ वाजता समराधना, ७.३० वाजता महेश चंद्रकांत नायक लिखित व दर्शन रघुनाथ कारेकर दिग्दर्शित धमाल विनोदी कोंकणी नाटक 'आमच्या लग्नाचे खतखते' सादर करण्यात येणार आहे. यात ओमराज तिवरेकर (बाबा), दत्तराज कारेकर(मामा), दर्शन कारेकर (स्वराज), श्रध्दा कारेकर (सारिका), बादल कारेकर (सुशांत), अथर्व कारेकर (धेडो), प्रणय तिवरेकर (इश्ट), आर्यन आरोसकर (बॉय), समर्थ हजारे (भटजी), विराज तिवरेकर (फोटोग्राफर), वेदांत कारेकर (जाण्टेलो), भावना खेडेकर (कृतिका), पुजा शिंदे (इश्टीण) यांच्या भूमिका असून तुनूज उमेश राटवडयांचे पार्श्वसंगीत लाभले आहे. रात्री ९.३० वाजता देवीच्या आवक वस्तूंची पावणी, रात्री १०.३० वाजता आतषबाजी व श्रींची पालखीतून मिरवणूक व त्यानंतर श्री भावई दशावतार नाट्यमंडळ, धामापूर, कुडाळ (महाराष्ट्र) यांचा ब्रम्हाक्ष उध्दार हा दशावतारी नाट्यप्रयोग होणार आहे.पालखी उत्सवाच्यावेळी सुवासिनींतर्फे दिप प्रदक्षिणा होईल. तरी सर्व सुवासिनींनी आपले साहित्य सोबत आणावे. समितीकडून तेल पुरविण्यात येईल. यंदाच्या रथसप्तमी उत्सवाचे यजमान सौ. व श्री. मनोहर रामा कालेकर, वन, डिचोली हे आहेत.भाविकांनी उत्सवास मोठ्या संख्येने उपस्थिती लावावी, असे आवाहन कार्यकारी समिती, श्री महामाया कालिका देवस्थान, वन, डिचोलीतर्फे करण्यात आले आहे.

व्हॉलीबॉल आणि ॲथलेटिक्स निवड चाचणी

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ३ : अखिल भारतीय नागरी सेवा सांस्कृतिक आणि क्रीडा मंडळ शुक्रवार दि. १४ ते मंगळवार दि. १८ आणि बुधवार दि. १९ ते गुरुवार दि. २० पर्यंत व्हॉलीबॉल आणि ॲथलेटिक्समध्ये विविध ठिकाणी अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेचे आयोजन करीत आहे. गोवा राज्य नागरी सेवा संघ निवडण्यासाठी क्रीडा आणि युवा व्यवहार संचालनालयाने निवड चाचणीचे आयोजन केले आहे. व्हॉलीबॉल निवड चाचणी ३ रोजी दुपारी ३.०० वाजता पणजी जवळील मसान-डे-अमोरिम ग्राउंड येथे झाली आणि ऍथलेटिक्स निवड चाचणी ६ रोजी दुपारी ३ वाजता ऍथलेटिक स्टेडियम बांबोळी येथे होईल. इच्छुक सरकारी कर्मचारी खेळाडूनी प्रभारी अधिकारी श्रीमती आंतोनेता पिंटो यांच्याकडे संपर्क साधावा आणि विभाग प्रमुखांनी रीतसर स्वाक्षरी केलेले ओळखपत्र आणि योग्य प्लेइंग किटसह दुपारी ३ वाजता कार्यक्रमस्थळी हजर राहावे. ज्या कर्मचाऱ्यांनी ६ महिन्यांपेक्षा कमी सेवा दिल्या आहेत ते या निवडणूक चाचण्यांमध्ये भाग घेण्यास पात्र नाहीत.

नानोडा : घुमट आरती सादर करताना बाल महिला कलाकार.

नानोडा येथील गणपती मंदिरात गणेश जयंती उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. ३ : नानोडा - डिचोली येथील श्री शांतादुर्गा कळंगुटकरीण पंचायतन गणपती मंदिरात श्री गणेश जयंती उत्सव समितीतर्फे गणेश जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. देवस्थानचे पुजारी लक्ष्मण भुस्कुटे यांच्या अधिपत्याखाली भाविकांनकडून बसून श्री चरणी सामूहिक अभिषेक करवून घेतले. विविध भागातून आलेल्या भाविकांनी सकाळपासून श्रींचे दर्शन घेतले. डिचोली मतदारसंघाचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, माजी आमदार नरेश सावळ, संजय शेट्ये, सरपंच डॉ. रामा गावकर स्थानिक पंच नीलम कारापुरकर अडवलपाल पंचायतीचे पंच गजानन पालकर आदींनी श्रींचे दर्शन घेवून आशीर्वाद घेतला. गावच्या महिलांनी दिंडीत सहभाग दर्शवून दिंडी सादर केली. गावच्या भजन कलाकारांनी भजन सादर केले यात साईनाथ कानोळकर, बाबलो गावकर, सचिन गावकर, शौनक केळकर मनोहर कानोळकर आदींनी भजन सादर केले. उसप येथील बाल महिला कलाकारांनी घुमट आरती सादर केली. उपस्थित सर्वांनी त्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. गणेश जयंती उत्सव समितीतर्फे त्यांचा सन्मान केला. यावेळी देवस्थानचे पूजारी श्री लक्ष्मण भुस्कुटे यांनी त्यांच्या कलागुणांसाठी विशेष बक्षीस प्रदान केले. संध्याकाळी भक्तगणाच्या उपस्थितीत आरतीने मोठ्या उत्साहात गणेश जयंती उत्सवाची सांगता करण्यात आली. या गणेश जयंती उत्सवात सर्वांनी मोलाचे सहकार्य करून आर्थिक बाबतीतही हातभार लावला. गणेश

बुमराह चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर पडण्याची शक्यता

स्पर्धेपर्यंत पाठीच्या दुखापतीतून सावरणे कठीण, हर्षितला मिळू शकते संधी

नवी दिल्ली, दि. ३ :

१९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीमधून वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह बाहेर पडू शकतो. ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील शेवटच्या कसोटी सामन्यात त्याला पाठीचा त्रास झाला. तो वेदनेने अस्वस्थ झाला.

एका निवडकर्त्याने दिव्य मराठीला सांगितले की, चॅम्पियन्स ट्रॉफीपर्यंत बुमराहला त्याच्या पाठीच्या दुखापतीतून सावरणे कठीण वाटते. तो इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील एकही सामना खेळू शकणार नाही.

जर तो तंदुरुस्त नसेल तर त्याच्या जागी हर्षित राणाला संघात समाविष्ट केले जाऊ शकते.

खरंतर, इंग्लंडविरुद्धच्या शेवटच्या एकदिवसीय सामन्यासाठी बुमराहचा संघात समावेश करण्यात आला होता. हा सामना १२ फेब्रुवारी रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाईल.

दरम्यान, बुमराह सोमवारी त्याच्या पाठीच्या दुखापतीची तपासणी करण्यासाठी बंगळुरूला पोहोचला आहे. तो २-३ दिवस बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स येथे वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली राहील. बुमराहच्या तंदुरुस्तीवर काम सुरू आहे, जर तो वेळेवर तंदुरुस्त झाला तर तो संघात राहील. आयसीसीने संघात बदल करण्यासाठी ११ फेब्रुवारीची अंतिम मुदत दिली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताचा पहिला सामना २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशविरुद्ध होईल.

भारताच्या निवड समितीने १८ जानेवारी रोजी चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघाची घोषणा केली. ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान दुखापत झालेल्या जसप्रीत बुमराहचाही संघात समावेश करण्यात आला. निवड समितीने बुमराहसाठी अर्शदीप सिंगला बॅकअप म्हणून ठेवले होते.

२०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात बुमराह दुखापतीतून परतला. तो २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा भाग होता. त्याने स्पर्धेतील ८ सामन्यांमध्ये एकूण १५ विकेट्स घेतल्या. त्याने अंतिम सामन्यात रीझा हेंड्रिक्स आणि मार्को जॅनसेन यांच्या महत्त्वाच्या विकेट्सही घेतल्या. या कामगिरीसाठी त्याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कारही मिळाला.

केपटाऊनने कॅपिटल्सचा ९५ धावांनी पराभव

नवी दिल्ली, दि. ३ :

एमआय केपटाऊनने रविवारी न्यूलँड्स येथे प्रिटोरिया कॅपिटल्सचा ९५ धावांनी पराभव केला. संघाने साखळी फेरीत गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले. उद्या म्हणजेच ४ फेब्रुवारीला क्वालिफायर-१ मध्ये पार्ल रॉयल्सचा सामना होणार आहे.

केपटाऊनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने २० षटकांत ५ गडी गमावून २०१ धावा केल्या. प्रत्युत्तरात प्रिटोरिया कॅपिटल्सचा संघ १४ षटकांत सर्वबाद १०६ धावांवर आटोपला. केपटाऊनसाठी सेदीकुल्ला अटल आणि कॉनर एस्टरहुइझेन यांनी अर्धशतके झळकावली. फिरकीपटू डॅन पिएड आणि थॉमस कोबेर यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. पिएडला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.

सेदीकुल्लाहने ७४, कॉनरने ६९ धावा केल्या

केपटाऊनसाठी सादिकुल्लाह अटलने ४६ चेंडूत ७४ धावा केल्या आणि कॉनर एस्टरहुइझेनने ४३ चेंडूत ६९ धावा केल्या. या दोघांमध्ये पहिल्या विकेटसाठी १३३ धावांची उत्कृष्ट भागीदारी झाली. कॅपिटल्सकडून जेम्स नीशमने सर्वाधिक ३ बळी घेतले.

२०१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना जेम्स नीशम व्यतिरिक्त प्रिटोरिया कॅपिटल्ससाठी इतर कोणत्याही खेळाडूला मोठी खेळी करता आली नाही. नीशमने सर्वाधिक ३२ धावा केल्या. केपटाऊनकडून डेन पिएड आणि थॉमस कोबेर यांनी ३-३ बळी घेतले.

ग्रुप स्टेजनंतर, अव्वल दोन संघ क्वालिफायर-१ खेळतील. हा सामना जिंकणारा संघ अंतिम फेरीत पोहोचेल. हा सामना उद्या म्हणजेच ४ फेब्रुवारी रोजी सेंट जॉर्ज पार्कवर खेळवला जाईल. तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर असलेल्या संघांमध्ये एलिमिनेटर सामना होईल. हा एलिमिनेटर सामना जिंकणाऱ्या संघाचा सामना क्वालिफायर-१ मध्ये क्वालिफायर-२ मध्ये पराभूत होणाऱ्या संघाशी होईल. हे दोन्ही सामने सेंच्युरियनमध्ये होणार आहेत.

सनरायझर्स इस्टर्न केपने सुरुवातीचे दोन्ही हंगाम जिंकले

या लीगचे पहिले दोन सत्र एडन मार्करामच्या नेतृत्वाखाली सनरायझर्स इस्टर्न केप संघाने जिंकले आहेत. पहिल्या सत्रात इस्टर्न केपने प्रिटोरिया कॅपिटल्सचा पराभव करून विजेतेपद पटकावले. गेल्या मोसमात संघाने अंतिम फेरीत डर्बन सुपर जायंट्सचा पराभव करून सलग दुसऱ्यांदा ट्रॉफी जिंकली होती.

'जय जय गौरी शंकर'ला हळर्ण येथे प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. ३ : हळर्ण येथे श्री वेताळ देवालयाच्या वर्धापनदिनानिमित्त सादर केलेल्या विद्याधर गोखले लिखित तसेच कला साधना संगीत संस्था - हणखणे इब्रामपूर यांनी सादर केलेल्या 'जय जय गौरी शंकर' नाटकाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.सर्व कलाकारांनी शेवटच्या क्षणा पर्यंत रसिकांची मने जिंकली.

सुरवातीला विष्णू गवस यांचा सन्मान चिन्न देऊन आयोजकातर्फे सत्कार करण्यात आला.

खास करून ह भ प माऊली विष्णू गवस यांनी श्री शंकराची भूमिका साकारून आपली संगीत, अभिनय कला अविस्मरणीय ठरवली.

तसेच मंडळाचे इतर कलाकार पुनेश राणे (श्रुंगी) व दर्शन मठकर (नारद), संतोषी परब (विजया) आणि निवेदिता पुणेकर (पार्वती) यांनी देखील सुरेख संगीत व अभिनय सादरीकरण केले.

त्याचप्रमाणे नंदीची भूमिका सत्यवान हळर्णकर तर शिवगण भूमिका दुर्गेश गवस आणि श्रीपाद हळर्णकर यांनी साकारली. नाटकाचे दिग्दर्शकन/नेपथ्य-अमर कोनाडकर यांनी केले. संगीत दिग्दर्शक विश्वास च्यारी तर तालरक्षक विकास नाईक होते. ध्वनी संकलनची तांत्रिक बाजू सुभाष शिरोडकर यांनी दर्जेदार सांभाळली. रंगभूषा - जितेंद्र परब (खुंटवळ). प्रकाश योजनेत तेजस खेडेकर यांनी कैलास पर्वत अगदी खास तेजोमय दाखविला. तसेच साई कळंगुटकर यांचे पाश्वसंगीत खास करून डमरू व पखवाज ध्वनी आकर्षित व श्रवणीय ठरले. नाटकाचे व्यवस्थापन श्री देव वेताळ सांस्कृतिक समिती हळर्ण यांनी केले. तसेच कला साधना संगीत संस्था भजनी मंडळ हणखणे इब्रामपूर पेडणे यांचे विशेष साहाय्य लाभले. सर्व नाट्य प्रेमिंकडून प्रयोगाचे खास कौतुक व अभिनंदन करण्यात आले.

कासारपाल सरकारी विद्यालयाचे बक्षीस वितरण, स्नेहसंमेलन

कासारपाल : बक्षीस वितरण व स्नेहसंमेलनात उपस्थित रामचंद्र गर्दे, सरपंच डॉ. रामा गावकर, समीर नादोडकर, मुख्याध्यापिका भाग्यश्री फाटक, सविता गवस, वर्षा मराठे व इतर.

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. ३ : सरकारी प्राथमिक विद्यालय - कासारपाल येथे वार्षिक बक्षीस वितरण व स्नेहसंमेलन साजरे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी आयडियल हायस्कूल-पिळगावचे चेअरमन रामचंद्र गर्दे हे प्रमुख पाहुणे, खास निमंत्रित पाहुणे म्हणून लाटंबार्से ग्रामपंचायतचे सरपंच डॉ. रामा गावकर, धेम्पो विश्व ग्रामशालाचे सुपरवायझर, समीर नादोडकर, मुळगाव क्लस्टरच्या सीआरपी मेधा केरकर, पंचायत सदस्या पूजा घाडी, हर्षदा परवार, बालवाडी शिक्षिका अनिता कर्पे आणि सावी वरक, मुख्याध्यापिका भाग्यश्री फाटक, पी.टी.ए. आणि एसएमसीअध्यक्ष अर्जुन घाडी आदी उपस्थित होते.

उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला. यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. यामध्ये कासारपाल प्राथमिक शाळेबरोबरच कासारपाल येथील अंगणवाडी तसेच खैटवाडा कासारपाल येथील अंगणवाडीतील विद्यार्थ्यांनीही भाग घेतला. औपचारिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका सिद्धाली सावंत यांनी केले. आभार प्रदर्शन शिक्षिका सुशांति कांबळी यांनी केले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या पालक वर्षा मराठे यांनी केले. तसेच शाळेतील शिक्षिका सविता गवस यांनीही कार्यक्रमाला हातभार लावला. प्रमुख पाहुणे तसेच सर्व मान्यवरांनी मुलांचे मनापासून कौतुक केले आणि वंदे मातरम हे गीत सादर करून कार्यक्रमाची सांगता झाली.

कासारवर्णे : विजेता ठरलेला शेट्ये ग्रुप कोरगाव संघासमवेत अशोक कळंगुटकर, अनिल शेट्ये, वसंत नाईक, ॲड. शाम शेट्ये व इतर.

क्रिकेट स्पर्धेत शेट्ये ग्रुप कोरगाव विजेता

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. ३ : कासारवर्णे येथील महादेव क्रिकेटर्स आयोजित गोवा आणि सिंधदुर्ग मर्यादित हेव्ही बॉल टेनिस क्रिकेट स्पर्धेत कोर गाव येथील शेट्ये ग्रुप विजेता. तर संघाला ५० हजाराचे प्रथम पारितोषिक मिळाले डिझेल बॉईज हणजूणे संघ उप विजेता ठरला.

विजेत्या शेट्ये ग्रुप संघाला ५० हजाराचे रोख पारितोषिक. व चषक देण्यात आला. उपविजेत्या डिझेल

डिझेल बॉईज हणजूण उपविजेता : विजेत्यांना ५० हजाराचे रोख पारितोषिक

बॉईज हणजू ने संघाला. रोख २५ हजार व चषक प्रदान करण्यात आला. साई समर्थ संघ नावेली संघ आणि फ्रेंड सर्कल, तळर्न संघ उपांत्य सामन्यात पराभूत झाले. त्यांनाही रोख पारितोषिक देण्यात आली.

याशिवाय अंतिम सामन्यात सामनावीर म्हणून निखिल गडेकर (शेट्ये ग्रुप, कोरगाव), उत्कृष्ट फलंदाज सोमनाथ नावेलकर (नावेली), उत्कृष्ठ गोलंदाज प्रितेश मोरूडकर (शेट्ये ग्रुप, कोरगाव), मालिकावीर निखिल गडेकर (शेट्ये ग्रुप, कोरगाव) यांना वैयक्तीक बक्षिसे देण्यात आली.

बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून वझरी सरपंच अनिल शेट्ये, माजी सरपंच अशोक कळंगुटकर, वारखंड उपसरपंच वसंत नाईक, उद्योजक ॲड शाम शेट्ये, श्री. कोरगावकर आदी उपस्थित होते.

योंगमुडो राष्ट्रीय चॅम्पियनशिप स्पर्धेत गोव्यातील संघाने जिंकली ५० पदके!

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी : योंगमुडो राष्ट्रीय चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये पदके प्राप्त केलेल्या मुलांसोबत पालक व प्रशिक्षक.

साखळी, दि. ३ : ९ व्या योंगमुडो राष्ट्रीय चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये गोव्याच्या खेळाडूंनी मार्शल आर्ट्समध्ये चमकदार कामगिरी केली.गोव्याच्या योंगमुडो असोसिएशनच्या २५ तरुण खेळाडूंनी या राष्ट्रीय योंगमुडो चॅम्पियनशिपमध्ये २८ सुवर्ण, १६ रौप्य आणि ६ कांस्यपदके अशी ५० पदके जिंकली.सदर स्पर्धा मुंबईच्या विरार येथे ग्रीन पॅराडाइझ रिसॉर्टमध्ये आयोजित केली होती. योंगमुडोचे संस्थापक असलेल्या आणि योंगमुडो असोसिएशन गोवाचे सरचिटणीस असलेल्या मास्टर विशांत सोलयेकर,प्रशिक्षक प्रल्हाद बेखणे, मनिष सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली गोवातील संघाने पूमसे आणि क्योरूगीची प्रात्यक्षिके दाखवली. १० वर्षांखालील व १२ वर्षांखालील गटात विजेतेपद तर १४ वर्षांखालील व १७ वर्षांखालील गटात उपविजेतेपद प्राप्त केले.

१० वर्षांखालील मुलांच्या गटात ओम पुंडलिक नाईक गोवेंकर याने पुमसे प्रकारात रौप्य, क्योरूगी प्रकारात सुवर्णपदक, १० वर्षांखालील मुलींच्या गटात आध्या सत्यजित नाईक हिने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात सुवर्ण,संस्कृती नाईक हिने पुमसे प्रकारात रौप्य,क्योरूगी प्रकारात सुवर्ण, अर्णवी अजित आंब्रले हिने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात सुवर्ण, तन्वी जयेश परब हिने पुमसे प्रकारात कांस्य, क्योरूगी प्रकारात रौप्य,

१४ वर्षांखालील मुलांमध्ये ईशान अतुल देसाई याने पुमसे प्रकारात सुवर्ण ,क्योरूगी प्रकारात रौप्य,साईल ताटे याने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात सुवर्ण, सक्षज राजेश बांदेकर याने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात कांस्य, अभिनव दिनकर देसाई याने पुमसे प्रकारात रौप्य, क्योरूगी प्रकारात कांस्य, श्रुजय शंकर मेदार याने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात सुवर्ण, ज्ञान वेर्णेकर याने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात सुवर्ण, कैवल्य प्रेमनाथ गावडे याने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात सुवर्ण, चैतन्य चंद्रकांत राणे यांनी पुमसे प्रकारात रौप्य,क्योरूगी प्रकारात सुवर्ण,गुरुप्रसाद साहू याने पुमसे प्रकारात रौप्य, क्योरूगी प्रकारात रौप्य, ऋग्वेद बर्वे याने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात कांस्य, यशराज माईणकर याने पुमसे प्रकारात रौप्य, क्योरूगी प्रकारात कांस्य,

१४ वर्षांखालील मुलींच्या गटात सौम्या गोडकर हिने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात रौप्य, सारा घाडी हिने पुमसे प्रकारात रौप्य, क्योरूगी प्रकारात रौप्य, माही नाईक हिने पुमसे प्रकारात रौप्य, क्योरूगी प्रकारात कांस्य, सिया आम्रो ताटे हिने पुमसे प्रकारात रौप्य,क्योरूगी प्रकारात रौप्य,

१७ वर्षांखाली मुलांच्या गटात मयांक मौर्या याने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात सुवर्ण,जय जयंत काणेकर याने पुमसे प्रकारात सुवर्ण,क्योरूगी प्रकारात सुवर्ण,

१७ वर्षांखालील मुलींच्या गटात श्वेता मौर्या हिने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात सुवर्ण,

१९ वर्षांखालील मुलींच्या गटात श्रावणी प्रमोद साळुंखे हिने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात सुवर्ण १९ वर्षांवरील मुलींच्या गटात प्रियांका मष्णू तांबूळकर हिने पुमसे प्रकारात सुवर्ण, क्योरूगी प्रकारात सुवर्ण पदक प्राप्त केले.

योंगमुडो असोसिएशनतर्फे विजेत्यांना व त्यांच्या पालकांना गौरविण्यात आले. जुडोचे मुख्य प्रशिक्षक विष्णू नाईक या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.प्रेमनाथ गावडे यांनी सूत्रसंचालन केले तर विशांत सोलयेकर यांनी आभार मानले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १५३ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केलुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 153 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .